# मुंबई विद्यापीठ

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/२६६ /२०२२

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे, कल्याण व सिधुदुर्ग परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक यांना कळविण्यात येते की, प्रथम सत्र २०२२ मध्ये विद्यापीठाने पारंपारीक पद्धतीने (offline) घेतलेल्या खालील नमुद अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व त्यासाठीचे विहित शुल्क Online पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत.

1) B.Pharmacy (Sem-VIII)
2) B.E. (Sem- VIII) (All Branches)
3) B.Ed. (Sem-IV)
4) M.A., M.Sc and M.Com. (Sem- II to IV)
5) M.M.S. (Sem-IV)
6) LL.B. (3 year Course) (Sem- VI)
7) LL.B. (5 Year Course) (Sem-X)
8) B.Architecture (Sem- VI)

**Path for Online Application:-**

www.mu.ac.in → Exams & Results → Examination → Application for Revaluation / Photocopy
Read the instructions carefully and proceed for filling the form.

उपरोक्त लिंक संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर पुढील सात दिवसाच्या आत सुरू करण्यात येईल व लिंक सुरू झाल्यापासून पुढील बारा दिवसांपर्यंत ही लिंक सुरू राहिल, तरी या कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

वरील परिक्षांव्यतिरीक्त ज्या परिक्षा विद्यापीठाने पारंपारीक पद्धतीने (offline) घेतलेल्या आहेत अशा सर्व परिक्षांसाठीचे पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रतिंसाठीचे अर्ज संबंधित परीक्षांचे निकाल जाहिर झाल्यापासून पुढील २० दिवसांच्या आत व ज्या परिक्षांचे निकाल हे परिपत्रक निर्गमित होण्यापूर्वी जाहीर झालेले आहेत अशा परिक्षांसाठी हे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून २० दिवसाच्या आत **सॉफ्ट कॉपी (सी.डी) व हार्ड कॉपी (पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपुर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, परिक्षा भवन, पहिला मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या वेळेत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.**

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाकडे वरील प्रमाणेअर्ज पाठविताना अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपुर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

<u>पारंपरीक पद्धतीने अर्ज सादर करण्यासाठीच्या विशेष महत्वाच्या सुचना:-</u>

१) पुर्नमुल्याकंनाच्या अर्जासाठी स्वतंत्र सी.डी व पत्र तसेच छायांकित प्रतीच्या अर्जांसाठी स्वतंत्र सी.डी व पत्र सादर करावीत.

२) सदर दोन्ही बाबी एकाच सी.डी. व त्यासाठी एकच पत्र असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

३) अर्ज परिपुर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपुर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

४) अर्ज स्वीकारण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

उपरोक्त दोन्ही (Online / Offline) पद्धतीसाठीचा **शुल्काचा तपशील पुढीलप्रमाणे:-**

| | **खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी** | **राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees)** |
|---|---|---|
| **अर्ज शुल्क :-** | **रू. १०/-** | **रू. १०/-** |
| **पुर्नमुल्यांकन शुल्क :-** | **रू. २५०/-** | **रू. १२५/-** |
| **छायांकित प्रत शुल्क :-** | **रू. ५०/-** | **रू. २५/-** |

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : ३० जून, २०२२

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे, कल्याण व सिंधूदुर्ग परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. केंद्रीय संगणक सुविधा विभागातील सर्व अधिकारी वर्ग
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्विय सहायक